निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
मंगळवार
१३ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३१९ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे


## मुलीच्या जन्मानं आनंद तर दुसरीकडे बापाला अपघातानं हिरावलं

### स्ट्रेचरवरील बाळंतिणीने फिरवला नवऱ्याच्या चेहऱ्यावर शेवटचा हात, मन हेलावून टाकणारं दृश्य

**आत्ताच एक्सप्रेस**

**सातारा/प्रतिनिधी/** भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेला जवान पत्नीच्या डिलिव्हरीसाठी सुट्टीवर गावी आला असतानाच त्यांचा अपघाती मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना साताऱ्यातील दरे येथे घडली. सिकंदराबाद-श्रीनगर येथे भारतीय सैन्य दलात सेवा बजावणारे सातारा तालुक्यातील दरे गावचे वीर जवान प्रमोद परशुराम जाधव यांचा अपघातात जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेने दरे गावासह संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. जाधव यांच्या घरी आनंदाचा क्षण शोकामध्ये बदलून गेला. पत्नीला प्रसूती वेदना सुरू झाल्यानंतर जवान प्रमोद जाधव यांनी तिला रुग्णालयात दाखल केले. प्रसूतीसाठी आवश्यक औषधी आणण्यासाठी ते मेडिकलकडे निघाले; पण ते परत रूग्णालयात आलेच नाहीत. रुग्णालयाकडे परत येत असताना त्यांचा अपघातात जागीच मृत्यू झाला. या मन हेलावणाऱ्या घटनेनं सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

प्रमोद जाधव यांच्या पत्नीने ऋतुजा हिने शनिवारी सकाळी एका गोंडस मुलीला जन्म दिला. तिच्या येण्याने सर्वत्र आनंद असायला हवा होता; पण त्याच वेळी कोणीतरी धाडस करून त्यांच्या पत्नीला सांगितले गेले की, तुमच्या पतीचा अपघाती मृत्यू झाला आहे. त्या माहितीनं तिची अवस्था आभाळ फाटल्यासारखी झाली.

**आठ तासांची लेक; ना बापाने लेकीला पाहिलं ना लेकीनं बापाला :** बाळंतीण ऋतुजाला सावरण्यासाठी नर्स, गावकरी आणि नातेवाईक पुढे आले. त्यांनी तिला स्ट्रेचरवरून गावात आणलं. अवघ्या आठ तासांच्या चिमुकल्या लेकीलाही तिच्या वडिलांना अखेरचा निरोप दिला. पत्नी



ऋतुजाचा स्ट्रेचर पतीच्या पार्थिवाजवळ ठेवला. थरथरत्या हाताने तिने पतीच्या चेहऱ्यावरून अखेरचा हात फिरवला. तो क्षण पाहून उपस्थितांचे मन हेलावून गेलं. तो क्षण उपस्थितांच्या डोळ्यात पाणी आणणारो होता. प्रमोद जाधव हे लेह-लडाख येथे भारतीय सैन्यात हवालदार पदावर कार्यरत होते. सातारा जिल्ह्यातील दरे येथे शनिवारी जवान प्रमोद जाधव यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आठ तासांची ओली बाळंतीण पत्नी ऋतुजाला स्ट्रेचरवरून आणले होते. हे दृश्य मन हेलावून टाकणारं होतं.

**आई नसल्याने पत्नीच्या डिलिव्हरीसाठी आठ दिवसांपूर्वी सुट्टीवर गावी आले :** प्रमोद जाधव यांना आई नसल्याने तेच आपल्या पत्नीच्या डिलिव्हरीसाठी ते सुमारे आठ दिवसांपूर्वी सुट्टीवर गावी आले होते. दरम्यान, कामानिमित्त दुचाकीवरून वाढे फाट्याच्या दिशेने जात असताना आयशर टेम्पोने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात प्रमोद यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पत्नीने एका गोंडस बाळाला जन्म दिला. पित्याच्या मृत्यूची बातमी आणि घरात आलेला नव्या जीवाचा आनंद, या दोन्ही गोष्टींना कुटुंबीय हादरून गेले.

### काही तासापूर्वीच जन्मलेल्या चिमुकलीनेही घेतले अंत्यदर्शन

अंत्ययात्रा अंत्यविधीच्या ठिकाणी पोहोचल्यानंतर प्रमोद जाधव यांची पत्नी आणि काही तासांपूर्वीच जन्मलेली चिमुकली मुलगी पित्याच्या अंत्यदर्शनासाठी आणण्यात आली होती. नवजात बालिकेने घेतलेले वडिलांचे अखेरचे दर्शन पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले, अनेकांना अश्रू अनावर झाले. शासकीय इतमामात वीर जवान प्रमोद जाधव यांना मानवंदना देत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी प्रशासनातील अधिकारी, माजी सैनिक, ग्रामस्थ आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशसेवेसाठी सदैव तत्पर असलेल्या या वीर जवानाच्या अकाली जाण्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## जिल्हा परिषद निवडणुकांसाठी सुप्रीम कोर्टाकडून नवी मुदत

### कधीपर्यंत होणार मतदान? तारीख समोर



**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/प्रतिनिधी/** महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांबद्दल मोठ्या प्रमाणात घोळ सुरू होता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित असलेल्या निवडणुका ३१ जानेवारीप्रूवी घेण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाकडून देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर, नगर पंचायती आणि नगर परिषदांच्या निवडणुका वेळेत पूर्ण झाल्या असून महानगरपालिकांच्या निवडणुकाही वेळेत पार पडत आहेत. अशात यंत्रणा अपुरी असल्याने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी अतिरिक्त १५ दिवसांची मुदतवाढ द्यावी, अशी मागणी राज्य निवडणूक आयोगाकडून सुप्रीम कोर्टाकडे करण्यात आली होती. कोर्टाने आज आयोगाला मोठा दिलासा देत ही मागणी मान्य केली आहे. त्यामुळे ज्या जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडण्यात आलेली नाही, तेथील निवडणुका या पुढील महिनाभरात पार पडणार आहेत.

राज्यातील एकूण ३२ जिल्हा परिषदांपैकी २० जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडण्यात आली आहे. त्यामुळे या २० जिल्हा परिषदा वगळून इतर १२ ठिकाणी पुढील काही दिवसांत निवडणूक कार्यक्रम घोषित होण्याची शक्यता आहे. तसंच जिथं आरक्षण मर्यादा ओलांडण्यात आलेली नाही अशा १२५ पंचायत समित्यांचीही निवडणूक जाहीर होणार आहे. तर आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

### आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या ठिकाणी निवडणुका कधी?

फेब्रुवारी आणि मार्चमध्ये दहावी-बारावीच्या परीक्षा असल्याने या काळात निवडणुका घेतल्या जात नाहीत. त्यामुळे ज्या ठिकाणी ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडण्यात आली आहे तेथील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका एप्रिल किंवा मे महिन्यात होण्याची शक्यता आहे. ज्या जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची टक्केवारी ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे, तिथे या आठवड्यातच निवडणुकांची घोषणा होऊन फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापूर्वी त्या पार पडतील.

## मुंबई महाराष्ट्राची नाही म्हणणाऱ्या नेत्याला संजय राऊतांनी सुनावलं

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** एकीकडे मुंबई मराठी माणसाची की आणखी कुणाची? या मुद्द्यावरून राज्यातील राजकारण तापले असतानाच, या वादात आता तामिळनाडूतून मुंबईत प्रचारासाठी आलेल्या भाजप नेत्याच्या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. भाजपचे तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई यांनी मुंबईचा उल्लेख 'बॉम्बे' असा करत, हे शहर महाराष्ट्राचे नाही अशा आशयाचे वक्तव्य केल्याने राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शिवाजी पार्क येथील जाहीर सभेत अण्णामलाई यांचा तीव्र शब्दांत समाचार घेतला. राज ठाकरे म्हणाले, मुंबईत रसमलाई आली होती म्हणे मुंबई आणि महाराष्ट्राचा काय संबंध? अरे भदद, तुझा काय संबंध आहे इथे यायचा? अशा शब्दांत त्यांनी अण्णामलाई यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांची अण्णामलाई यांच्यावर टीका करताना जीभ घसरल्याचे पाहायला मिळाले.

**नेमकं काय म्हणाले संजय राऊत?**

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज सोमवारी (दि. १२) पत्रकार परिषदेत विविध



मुद्द्यांवर भाष्य केले. यावेळी त्यांना के. अण्णामलाई यांनी केलेल्या वक्तव्याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले, अण्णामलाई कोण आहे? साद भदद... भाजपने आमच्यावर फेकलेले हे मुंगळे आहेत, असा खरपूस समाचार त्यांनी घेतलाय. आता संजय राऊत यांनी केलेल्या वक्तव्यावर भाजप नेते काय प्रतिक्रिया देणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**ठाकरेंना जास्त सभा घ्यायची गरज नाही**

दरम्यान, रविवारी मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची मुंबईच्या शिवाजी पार्क येथे जाहीर सभा पार पडली. याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, ठाकरेंना जास्त सभा घ्यायची गरज नाही. कालची सभा परिवर्तन करणारी होती. कालचं भाषण तुफान झालं. आज ठाणेमध्ये सभा आहे. जे प्रेझेंटेशन राज साहेब यांनी केलं ते आतापर्यंत कोणी केलं नाही. दूध का दूध, पाणी का पाणी सर्व काही गौतम अडाणी... शिवसेना कायम उद्योगपतींच्या पाठीमागे राहिली. कारण रोजगार वाढेल, राज्याची आर्थिक स्थिती वाढेल. पण हे मुंबई शहरातील विमानतळ बाहेर काढत आहेत. मुंबई सारख्या शहराला स्वतःचं विमानतळ नसेल, असा हल्लाबोल त्यांनी केला.

### अण्णामलाई काय म्हणाले होते?

के अण्णामलाई यांनी म्हटले होते की, मोदीजी हे केंद्रामध्ये आहेत, देवेंद्रजी राज्यामध्ये आहेत आणि बॉम्बेमध्ये भाजपचा महापौर असेल. कारण बॉम्बे हे महाराष्ट्राचे शहर नाही, ते आंतरराष्ट्रीय शहर आहे. या शहराचे बजेट हे ७५ हजार कोटी रुपये इतके आहे. चेन्नईचे बजेट हे ८ हजार कोटी तर बंगळुरुचे बजेट हे १९ हजार कोटी रुपयांचे बजेट आहे. त्यामुळे मुंबईचे व्यवस्थापन करण्यासाठी तुम्हाला चांगले लोक प्रशासनात बसवावे लागतील, असे वक्तव्य त्यांनी केले होते.

## नाशिकमध्ये खाकी वर्दीला डाग लागला

### अटकपूर्व जामिनासाठी दोघांनी मागितली दोन लाखांची लाच, गुन्हा दाखल होताच पोलीस पसार

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक/प्रतिनिधी/** फसवणुकीच्या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळवून देण्यासाठी कंत्राटदाराकडून दोन लाख रुपयांची लाच स्वीकारल्याचे निष्पन्न झाल्याने मुंबईनाका पोलीस ठाण्यातील दोन उपनिरीक्षकांवर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, गुन्हा दाखल होताच दोन्ही पोलीस उपनिरीक्षक पसार झाले असून, त्यांचा शोध सुरू आहे. दत्तात्रय एकनाथ गोडे (रा. शकुंतला हाइट्स, कामटवाडे रोड, सिडको) आणि अतुल भुजंगराव क्षीरसागर (रा. सिंहगड, शासकीय विश्रामगृह) अशी या संशयित उपनिरीक्षकांची नावे आहेत.

**उपहारगृह चालक पिता-पुत्रांमार्फत 'मध्यस्थी' :** या प्रकरणात गडकरी चौकातील शासकीय विश्रामगृहाच्या उपहारगृहाचे चालक रमेश गंभीरराव आहिरे आणि त्यांचा मुलगा कल्पेश रमेश आहिरे यांनी मध्यस्थी केल्याचे उघड झाले आहे. क्षीरसागरच्या माध्यमातून गोडे याच्यापर्यंत पोहोचत, चौघांनी संगनमताने लाचेची रक्कम स्वीकारल्याचा आरोप आहे. विशेष बाब म्हणजे, ज्या मुंबईनाका पोलीस ठाण्यात हे दोन्ही उपनिरीक्षक कार्यरत आहेत, त्याच पोलीस ठाण्यात त्यांच्याविरोधात एसीबीकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे (एसीबी) उपअधीक्षक एकनाथ पाटील यांनी फिर्याद दिली आहे.

**लाच मागणीची पडताळणी; सापळ्यात रक्कम स्वीकारताना पकडले :** या प्रकरणातील मूळ तक्रारदार केतन भास्करराव पवार हा मुंबईनाका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या फसवणुकीच्या गुन्ह्यातील संशयित असून, तो व्यवसायाने कंत्राटदार आहे. अटकपूर्व जामीन मिळवून देण्यासाठी दोन लाख रुपयांची लाच मागितली जात असल्याची मागणी उपनिरीक्षकांमार्फत उपहारगृह चालक कल्पेश आहिरे याने केल्याचे तपासात समोर आले.


## सुंदर, कृष्णा बाहेर; रेड्डी, अर्शदीप सिंग आत... न्यूझीलंडविरुद्ध सामन्यात अशी असेल टीम इंडियाची रणनिती

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** भारताने वडोदऱ्यात खेळल्या गेलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडचा ४ विकेट्सने पराभव करत तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. आता या मालिकेतील दुसरा सामना बुधवार, राजकोट येथे खेळवला जाणार आहे. मात्र, या सामन्याआधीच टीम इंडियाला मोठा धक्का बसला आहे. भारतीय अष्टपैलू खेळाडू वॉशिंग्टन सुंदर दुखापतीमुळे संपूर्ण वनडे मालिकेतून बाहेर पडला असून, त्यामुळे संघ व्यवस्थापनाची चिंता वाढली आहे.

**राजकोटची खेळपट्टी आणि रणनीती :** राजकोटची खेळपट्टी फलंदाजांसाठी स्वर्ग मानली जाते. येथे धावांचा पाऊस पडतो. सामन्याच्या सुरुवातीला वेगवान गोलंदाजांना थोडी मदत मिळू शकते, मात्र जसजसा सामना पुढे जातो तसतशी ही खेळपट्टी पूर्णपणे फलंदाजीस अनुकूल होते. दुसऱ्या डावात फिरकी गोलंदाजांना थोडीशी पकड आणि टर्न मिळण्याची शक्यता असते, पण सपाट पिचवर यश मिळवण्यासाठी त्यांना अत्यंत अचूक टप्पा आणि लाईन राखावी लागेल.

**भारतीय प्लेइंग इलेव्हनमध्ये २ बदल संभव :** सुंदरच्या अनुपस्थितीत राजकोट वनडेसाठी भारतीय संघात दोन बदल होण्याची शक्यता आहे. सुंदरच्या जागी नितीश रेड्डीला संधी दिली जाऊ शकते. नितीश खालच्या फळीत फलंदाजी करू शकतो आणि गरज



पडल्यास वेगवान गोलंदाजीचा पर्यायही देतो. दुसरा बदल प्रसिद्ध कृष्णाच्या रूपात होऊ शकतो. पहिल्या सामन्यात कृष्णा फारसे प्रभावी ठरले नव्हते, विशेषतः डेथ ओव्हर्समध्ये त्यांना मोठा फटका बसला होता. त्याचमुळे न्यूझीलंडचा स्कोअर ३०० धावांपर्यंत पोहोचला. जर प्रसिद्ध कृष्णाला वगळण्यात आले, तर त्यांच्या जागी अर्शदीप सिंगला संघात संधी मिळू शकते.

भारतासाठी डावाची सुरुवात रोहित शर्मा आणि शुभमन गिल करतील. त्यानंतर फलंदाजी क्रमात विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल आणि रवींद्र जडेजा यांचा समावेश असेल. गोलंदाजी विभागात कुलदीप यादव, हर्षित राणा आणि मोहम्मद सिराज आपली जागा कायम ठेवतील. हर्षित राणाने पहिल्या वनडेत महत्त्वाची २७ धावांची खेळी करताना २ विकेट्सही घेतल्या होत्या, तर मोहम्मद सिराजची गोलंदाजीही प्रभावी ठरली होती. त्यामुळे दुसऱ्या सामन्यातही या तिघांकडून भारतीय संघाला मोठ्या अपेक्षा असतील. दुसऱ्या वनडेसाठी भारताची संभाव्य प्लेइंग इलेव्हन रोहित शर्मा, शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल, रवींद्र जडेजा, नितीश कुमार रेड्डी, हर्षित राणा, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंग.

# आश्वासने ही लाभासाठी की देशाच्या विकासासाठी?



आगामी पंधरा तारखेला नगरसेवकपदाची निवडणूक होवू घातलेली आहे. निवडणूक पक्ष जनतेला मतदान करायला लावत आहेत. त्यासाठी मागील लोकसभेसारखी जनजागृती देखील करीत आहेत. लोकांनी मतदान करावे म्हणून ही जनजागृती आहे. शालेय स्तरावरही विद्यार्थ्यांच्या मार्फत जनजागृतीपर काही उपक्रम राबविण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना राजकारणापासून दूर ठेवावे असा कयास असतांनाही आताही विद्यार्थी आपला अभ्यास सोडून सर्वांनी मतदान करावं हे आवर्जून सांगणार आहेत. त्यासाठी भित्तिपत्रकासह विविध उपक्रम शाळेचे विद्यार्थी राबविणार आहेत. हे सर्व प्रयत्न मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी आहे. नेतेही निवडणूकीत निवडून येण्यासाठी आश्वासने देत आहेत. मी अमुक करेल मी तमूक करेल. मात्र ही आश्वासनं लाभ देण्यासाठी आहेत की देशाचा विकास करण्यासाठी? हाच प्रश्न संभ्रम निर्माण करणारा आहे व त्याचं उत्तरही अनाकलनीयच आहे.

मतदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे व या माध्यमातून देश चालवायला दिला जाणार आहे नेत्यांना. नेते कोण तर ते आपले प्रतिनिधी. ज्याला जनता निवडून देणार आहे. जनता असा नेता निवडणार आहे की जो इमानदार असणार. ज्यावर कोणतेच भ्रष्टाचाराचे आरोप नसणार. जो काम करणारा असणार. जो कर्तव्यनिष्ठ, नम्र व सुस्वभावी असणार. परंतु आजपर्यंत तरी असं घडलं काय? खरंच इमानदार असलेले, काम करणारे, भ्रष्टाचारी नसलेले नेते निवडून आले काय? याचा विचार केल्यास आजपर्यंत जनतेला असे नेते सापडलेच नाहीत. प्रत्येकांनी निवडणूक लढवली व निवडणूक लढवीत असतांना मी किती इमानदार आहे हेच दाखवले. परंतु पदड्याआड मात्र संपत्ती वाढली व मालमत्ताही तेवढीच वाढली. ही वाढलेली मालमत्ता कुठून आली? असा विचार केल्यास त्याला उत्तर दिसत नाही.

घराणेशाहीबाबत उत्तर देतांना आजही एक नेता व त्या नेत्याचं घरचेच त्याचे नातेवाईक, असे सर्वचजण निवडणूकीच्या रिंगणात उभे राहात असतात. कधी पती पती एकमेकांविरुद्ध तर कधी पिता पुत्र एकमेकांविरुद्ध, कधी बहिण भाऊ एकमेकांविरुद्ध तर कधी नातू व आजे एकमेकांविरुद्ध, कधी सासरे व सुनादेखील निवडणूकीत एकमेकांविरुद्ध उभे राहात असतात. अन् जनताही अशांना निवडून देत असते, एक प्रकारचा विश्वास दाखवून. त्यावेळेस जी मंडळी निवडणूकीच्या रिंगणात असतात. तेव्हा मोठमोठी आश्वासनं देत असतात. मात्र जेव्हा अशी मंडळी निवडून आली की त्या नेत्यांनी दिलेलं आश्वासन कुठं जातं तेच कळत नाही. आश्वासन गायब होतं, अन् त्याठिकाणी स्वार्थ जागा होतो. मग ज्या नेत्याजवळ कालच्या घडीला काहीही नसलं तरी आज त्याच नेत्यांजवळ गडगंज संप्पती उभी राहते. ही अशी नेत्यांची संपत्ती. नेते निवडणूकीतून मालामाल होत असतात आणि जनता बेहाल होत असते.

सरकार....... सरकार कोणतेही असो, निवडणूक सुरु असतांना काही गोष्टी नेमक्या दरवेळेस त्यांच्या आश्वासनात असतात. वीज बिल कमी करु, वृद्धांना पेन्शन देवू, शेतकरी आत्महत्या थांबवू, शेतकरी वर्गाला कर्जमाफी देवू, सिलेंडरचे दर कमी करु, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती कमी करु, रोजगार निर्मीती करु, रोजगार देवू, अमूक करु ढमूक करु. निव्वळ आश्वासनंच. जनतेची दिशाभूल करणारी आश्वासनं. त्यावर जनता भाळते व मतदान करते. त्यानंतर सरकार निवडून येताच काही आश्वासनांची प्रतिपुर्ती होते. काहींची होत नाही. शिवाय अशी प्रतिपुर्ती होत असतांना एखादी योजना आणली जाते. त्या योजनेचा लाभ दोनचार लोकांना तेवढा दिला जातो आणि सांगितलं जातं व मोठ्या प्रमाणात जाहीरात होते की आम्ही अमूक योजनेचं आश्वासन दिलं होतं. ते आम्ही राबवलं व पुर्ण केलं. आता यावर विचार करण्याची ही गरज आहे की जे आश्वासन निवडणूकीच्या वेळेस दिलं जातं, ते आश्वासन केवळ चार दोन लोकांनाच दिलं जातेय की सर्वांनाच. जर ते आश्वासन सर्वांनाच दिलं जातं तर मंग त्या आश्वासनाचा लाभ एकदोघांनाच का? सर्वांना का नाही? असे प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतात. आश्वासनाच्या परीपुर्तीत जनतेला राशन निःशुल्क दिलं जातं, महिलांना व वृद्धांना निशुल्क बससेवा दिल्या जातात. वृद्धांना पेन्शन, निराधार असलेल्या विधवांना पेन्शन, कलावंतांना पेन्शन. या सर्व गोष्टी केल्या जातात. परंतु या सर्व गोष्टींचा लाभ नेमके कोण घेतात? यावर विचार केला जात नाही. खरंच ज्या विधवांना पेन्शन मिळते, त्या विधवा खरंच विधवा खऱ्या विधवा असतात का की पेन्शन पुरत्याच विधवा असतात. राशन दुकानात सर्वांनाच अन्नधान्य मोफत मिळते. जे खरे लाभार्थी असतात, त्यांनाही आणि जे लाभार्थी नसतात, त्यांनाही. मग दुसर्याच दिवशी गाडी फिरते, राशनचे तांदूळ विकत घेण्यासाठी. जे लाभार्थी राशन दुकानातून लाभाचा तांदूळ उचलतात. तो तांदूळच ते खात नाहीत. विकून टाकतात नव्हे तर त्यातून पैसा कमवतात व घरी बसून ऐषआराम भोगतात.

सरकारच्या बऱ्याच योजना अशाच आहेत. जनतेला काम करण्याची गरजच नाही. काही लोकांना विधवा नसतांना विधवा म्हणून मिळणारी पेन्शन, एसटीचा मोफत प्रवास, लाभार्थी नसूनही राशनचे मिळणारे मोफत धान्य, वृद्ध नसतांनाही वृद्ध असल्याचा दाखला सादर करुन मिळविलेली रक्कम, निराधार नसतांनाही निराधार म्हणून मिळविलेली रक्कम. अन् या सर्व प्रकरणाची शहानिशा केल्यास सत्य आढळून येतं की हे राशनचे लाभार्थी खरे नाहीत. यांच्याकडे चारचाकी गाड्या आहेत, मोठमोठे बंगले आहेत, निराधाराच्या लाभार्थ्यांना चार चार मुलं आहेत, वृद्ध पेन्शनधारकाचे वय वर्षे पंच्चावन आहे, शिवाय या सर्वांच्या घरात नोकरचाकर आहेत, काही विधवांना पतीही आहेत. मात्र अशी शहानिशा करुन सत्य जरी आढळून आलं तरी कारवाई होवूच शकत नाही. कारण शहानिशा करणारेही डकैतीच असतात. एखादा व्यक्ती अशा प्रकरणात दोषी आढळून आल्यास त्यांच्याकडून लाच म्हणून रक्कम घेतली जाते व सोडून दिले जाते. ती प्रकरणं तिथल्या तिथंच निपटवली जातात. कोणावरच कारवाई होत नाही. असे जर वारंवार घडत असेल तर लाभार्थी का घाबरतील? ते घाबरणारच नाही. त्यांनाही माहीत आहे की कारवाई होईल तेव्हा होईल, आताचं पाहा, समजा एखाद्यावेळेस कारवाई झालीच तर आपण आंदोलन करु. नेत्यांना जाब विचारु. विचारु की त्यांनी भ्रष्टाचार केला नाही काय? विचारु की त्यांच्याजवळ एवढा पैसा कुठून आला? अन् त्यावरही सरकार ऐकत नसेल तर सरकारला निवडणूकीच्या वेळेस धडा शिकवू. आमच्यावर कारवाई केली ना. मग आता बघा, तुम्हाला आम्ही निवडणुकीतून कसा धडा शिकवला.

महत्वाचं सांगायचं झाल्यास काही काही लाभार्थी लोकांचं असं वागणं. असं वागणं बरं नाही. तरीही, काही काही काही लाभार्थी असेच वागत असतात. तसेच तेच लाभार्थी कोणतं सरकार कसं राहील. देशाचा विकास करेल की नाही. याचा विचार करीत नाहीत. फक्त लाभातून आमचं पोट कसं भरेल, याचाच विचार करीत असतात. मात्र देशाचा विकास जनतेला अशा लाभाच्या योजनेतून होत नाही. उलट देश अशा योजनेतून बरबाद होत असतो. कारण ज्यांना योजना मिळतात. त्यांच्यातील काही लोकं खरे लाभार्थी असतात की ज्याचे प्रमाण मोजले तर बोटावरच मोजण्याइतके असते. काही लाभार्थी असेही असतात की जे खरे लाभार्थी नसतात व सरकार अशाच लोकांमुळं निवडून येत असते निवडणुकीत. परंतु यातून इतर सर्वच बऱ्याच लोकांचे नुकसान होत असते. जे लोकं कर रुपात पैसा भरतात. कारण अशा लाभार्थ्यांना देण्यात येणारा पैसा हा काही सरकार आपल्या खिशातून देत नाही तर तो पैसा जनतेच्याच खिशातून कर रुपात वसूल केल्या जात असतो. ज्यातून जनतेच्या खिशाला कात्री पडत असते. हा दरोडाच असतो जनतेच्या पैशावर, दिवसा ढवळ्या टाकलेला.

खरं तर, अशा लाभार्थी योजना देण्यातून लोकं आळशी बनतात. ते कामं करीत नाहीत, ही वास्तविकता आहे. त्यामुळं अशा योजना देण्यापेक्षा जर देशाचा विकास खऱ्या स्वरुपात करायचा असेल तर अशा योजना देवूच नयेत. त्या बदल्यात वीज बिलाचे दर कमी करावेत. सिलेंडरचे दर कमी करावेत. देशात उद्योग निर्मीती करुन लोकांच्या रोजगाराचे प्रश्न सोडवावेत. प्रवासी भाडे कमी करावेत. जीवनावश्यक वस्तूंचे भाव कमी करावेत. शिक्षण निःशुल्क करावं. एवढंच नाही तर शेतीसाठी सिंचन योजना राबवाव्यात की जेणेकरुन देशातील शेती समृद्ध होईल. विदेशातून कोणताच माल निर्यात करावा लागणार नाही. ज्याचा लाभ तळागाळातील सर्वच लोकांना घेता येईल, ज्यात गरीब, श्रीमंत असा भेदभाव दिसणार नाही, निर्माणही होणार नाही व देश तेवढाच खऱ्या अर्थानं सृजलाम सुफलाम होईल यात शंका नाही.

– **अंकुश शिंगाडे**, नागपूर ९३७३३५९४५०

# तिळगुळ घ्या... गोड गोड बोला...!!



भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकर संक्रात हा त्यापैकीच एक सण. मकर संक्रात हा वर्षातील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. मकर संक्रांत हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. आपल्या महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्व दिले जाते. मकर संक्राती म्हणजे सूर्याने मकर राशीत प्रवेश करणे. सूर्य ज्या दिवशी दक्षीयणातून उत्तरायणात मार्गक्रमण करतो त्या तिथीला मकर संक्रांत साजरी केली जाते. ही तिथी कधी १४ जानेवारीला येते तर कधी १५ जानेवारीला येते. यावर्षी ही तिथी १४ जानेवारीला आली आहे. संक्रात ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तीळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगुळ वाटला जातो. संक्रातीच्या दिवशी तीळ आणि गूळ यांच्या वड्या किंवा लाडू एकमेकांना देण्याची पद्धत आहे. तिळगुळ देताना तिळगुळ घ्या गोड गोड बोला असा संदेशही दिला जातो. एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तीळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे प्रतिकात्मक रूपही या सणाला आहे. एकमेकांशी असलेली कटुता भांडण विसरून एकत्र येण्याचा संदेश देणारा हा सण आहे. मकर संक्रातील विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी कुंकू लावून सौभाग्याचे वान देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे. पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रातीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. मकर संक्रांत हा सण महिलांचा सण असे मानले जात असले तरी लहान मुलेही या सणाची आतुरतेनं वाट पाहत असतात. मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. अनेक गावात पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची, आकाराची पतंगे उडताना दिसतात. पतंगाचे विविध आकार रंग पाहून मन प्रसन्न होते. एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकर संक्रात म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकर संक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! तिळगुळ घ्या गोड गोड बोला!!

– **श्याम ठाणेदार**, दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५

# श्री गुरु तेग बहादुर साहिबजी – 'हिंद दी चादर'



धर्म आणि मानवतेच्या रक्षणासाठी ज्यांनी आपले जीवन अर्पण केले, असे महापुरुष इतिहासात अजरामर झाले आहेत. शीख परंपरेतील नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिबजी हे असेच एक महान व्यक्तिमत्त्व होते. त्यांना 'हिंद दी चादर' म्हणजेच भारतभूमीचे संरक्षण करणारे कवच म्हणून ओळखले जाते. धर्मस्वातंत्र्य, न्याय आणि सहिष्णुतेसाठी त्यांनी दिलेले बलिदान भारतीय संस्कृतीतील अत्यंत गौरवास्पद अध्याय आहे. त्यांच्या विचारांप्रमाणे जीवन जगणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे.

श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचा जन्म एप्रिल १६२१ मध्ये अमृतसर येथे झाला. ते शीख धर्माचे सहावे गुरु श्री गुरु हरगोबिंद आणि माता नानकी यांचे सुपुत्र होते. त्यांचे मूळ नाव त्यागमल होते. लहान वयातच एका युद्धात त्यांनी अपूर्व शौर्य दाखवले. त्यामुळे त्यांना 'तेग बहादुर' म्हणजेच शूर आणि तळपती तलवारीसारखे धैर्यवान असे नाव मिळाले. १६६४ मध्ये त्यांना गुरु पदाची दीक्षा मिळाली.

त्या काळात देशात क्रूर राजवटीमुळे मोठ्या प्रमाणावर धार्मिक अत्याचार सुरू होते. लोकांवर जबरदस्तीने धर्मांतर लादले जात होते. धर्म, श्रद्धा आणि संस्कृती नष्ट करण्याचे प्रयत्न होत होते. सामान्य जनता छळ, अन्याय आणि भीतीच्या वातावरणात जगत होती. या सगळ्या परिस्थितीमुळे समाजात मोठा हाहाकार माजला होता.

अशा कठीण काळात श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला. त्यांनी धर्म आणि मानवतेच्या रक्षणासाठी अखेरपर्यंत संघर्ष केला. मुघल सत्ताधीशांनी त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर अमानुष अत्याचार केले, तरीही त्यांनी आपला संकल्प सोडला नाही. अखेर त्यांनी धर्मस्वातंत्र्यासाठी सर्वोच्च बलिदान दिले. सत्य, करुणा, संयम आणि चारित्र्याचा संदेश देत ते शहीद झाले.

त्यांचे जीवन निर्भयता, त्याग आणि मानवतेचे प्रतीक आहे. त्यांच्या शिकवणीचा संदेश बालक, युवक आणि प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे. त्यांच्या बलिदानामुळे धर्म अबाधित राहिला. यावर्षी त्यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने राज्यात आणि देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विभागातर्फे आणि श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या माध्यमातून विविध प्रबोधनात्मक उपक्रम राबवले जात आहेत. हे उपक्रम केवळ श्रद्धांजली नसून त्यांच्या विचारांची ज्योत पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचा एक प्रयत्न आहे.

७ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथील सुरेश चंद्र सुरी मैदानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याशिवाय मॅरेथॉन, रॅली, भक्तीगीत, स्मरणिका प्रकाशन असे अनेक सामाजिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवले जात आहेत.

ग्रंथाला गुरु मानावे आणि धर्माचे रक्षण करणारा माणूस घडवावा, ही श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांची शिकवण होती. त्यांच्या शौर्य, त्याग आणि विचारांचे स्मरण करून जीवन समृद्ध करणे हेच खरे धर्मकर्तव्य आहे.

संकलन – **जिल्हा माहिती कार्यालय**, सिंधुदुर्ग

# जिजाबाई एक बाणेदार व्यक्तीमत्व



आज सगळं जगच शिवरायाच्या पराक्रमाचा अभ्यास करत आहे. कोणी शिवरायांसारखा व्यक्ती कधी झालाच नाही असे मानतात नव्हे तर जय भवानी जय शिवाजी म्हणत शिवसेनाही शिवरायांचा गौरव करते. अशा या शिवरायांना घडवलं कोणी? ते घडवलं शिवाजी महाराजांची माता जीजाबाईंनी.

जीजामाईचा जन्म बुलढाणा जिल्ह्यात सिंदखेडराजा इथे १२/०१/१५९८ ला झाला. त्यांना चार भाऊ अनुक्रमे दत्ताजी, अचलोजी, रघुजी आणि महादूजी. ज्यावेळी जीजाऊने खेळणी हातात पकडायची होती. त्यावेळी जीजाबाईच्या हातात लखुजींनी तलवार देवून युद्धनीतीचे डावपेच शिकवले. बालविवाह प्रथा अस्तित्वात असल्याने वयाच्या सातव्या वर्षांत म्हणजे डिसेंबर १६०५ ला जीजाऊचा विवाह शहाजीशी झाला. पहिला पुत्र संभाजी त्यानंतर एक एक करीत जीजाऊला आठ मुलं झाली. (सहा मुली आणि दोन मुलं.) संभाजी चांगले साहित्यीक होते. त्यांचे मन लढाईत रमले नाही. तरीही जीजाऊच्याच प्रेरणेने तेही युद्धकला शिकले होते. जेव्हा २५ जुलै १६४८ ला मुस्तफा खानाने फितुरीने जीजा या गावी शहाजींना कैद केले. त्या अपमानाचा बदला घेण्यासाठी विजापुरतर्फे लढत असतांना १६५५ मध्ये संभाजी युद्धात मरण पावले. पुढे रपेट करीत असतांना घोड्यावरुन पडून घायाळ झाल्यानंतर शहीजीदेखील २३ जाने १६६४ ला मरण पावले.

महत्वाचं म्हणजे युद्धप्रसंगी शहाजी बाहेर बाहेर असतांना याच माता जीजाऊने शिवरायांना सांभाळले. त्यांचे संगोपनही केले. विशेषतः स्त्रियांना युद्धात परवानगी नसल्याने शिवरायांना घडवीत असतांना त्यांच्यात लखुजींनी शिकविलेल्या गुणांचा व युद्धकौशल्याचा वापर करुन महत्वाकांक्षा भरली. त्यांना राम क्रिष्ण यांच्या युद्धकौशल्यनीत्या शिकविल्या. रामायण महाभारत यातील व्यक्तीमत्वाचा अभ्यास त्यांच्याकडून पाठ करुन घेतला. तसेच जनाबाई, मुक्ताबाई, संत ज्ञानेश्वर शिकवला. तुकाराम समर्थ रामदासही. या सर्वांच्या चरित्रातून प्रेरणा घेवून शिवरायांनी स्वतःच मित्र बनवले. लहानपणापासून डोंगरं फिरणे, किल्ले फिरणे, आडवाटा शोधणे, घोड्यावर बसून फिरणे, नव्हे तर जीवाला जीव देणारे मित्र मिळवणे. ती मैत्री टिकवणे या सा–या गोष्टी बालवयातच शिवाजींनी हस्तगत केल्या. सांबरे पाटलाकडून घेतलेल्या जागेवर पुढे १६३९ ते १६४७ च्या काळात पुण्यात लालमहाल बांधून त्याच ठिकाणी सुरक्षीत ठिकाण मानून जीजाऊला ठेवल्यानंतर जीजाऊंनी त्याच काळात शिवरायांना घडवलं. स्वराज्यस्थापनेसाठी जीजाऊंनी स्वतःचा मुलगा दावणीला लावला.

आज शिवराय हवा आहे. पण आपल्या घरात नाही तर दुस–यांच्या घरात. स्वतःच्या मुलाला साधं खरचटलेलंही आपल्याला बघवत नाही. तो मुलगाही मी माझी पत्नी आणि माझी मुले यातच गुरफटून राहतो. पण शिवाजी घडवीत नाही. आई तर नाहीच नाही. आईबाप फक्त शिकवितात, नोकरीसाठी. नोकरीचे आमीष दाखवतात मुलांना. मग मुलेही नोकरीसाठी शिकतात. मग जेव्हा नोकरी मिळत नाही, तेव्हा आत्महत्या करतात.

आज आम्हाला शिवाजीची वेशभूषा करणारा शिवाजी हवा नाही, नाही वेशभूषा केली तरी चालेल. पण शिवाजी महाराजांसारखे गुण असायला हवे आहेत आमच्या मुलात. तसा मुलगा हवा आहे आम्हाला. मात्र आम्ही वेषभुषेलाच महत्व देतो शिवरायांच्या. प्रत्यक्षात गुणाला महत्व देत नाही. जर एखाद्यानं म्हटलं की देशावर शत्रूनं चढाई केली. आपल्या मुलाला युद्धावर पाठवा, तर कोणीही आपल्या मुलाला युद्धावर पाठवणार नाही. कारण आम्हाला आज आमचा पुत्र प्रिय आहे. मात्र जीजामातेनं तसं केलं नाही. त्यांनी आपला मुलगा दावणीला लावला. त्याला स्वराज्यासाठी तयार केलं. ती होती म्हणून स्वराज्य घडलं. कारण तिनं मरणालाही घाबरु नये हेच शिवरायांना सांगीतलं होतं. म्हणूनच आज शिवरायांचा आपल्याला अभिमान आहे. त्यामुळंच आपण आपल्या मुलाची वेषभुषा शिवाजी महाराजासारखी करुन घेतो. तसाच अभिमान जीजावूबद्दलही मनात बाळगावा. ती होती म्हणून स्वराज्याची व्याख्या आपल्याला समजली. त्यांनी जरी शिवरायांना औरंगजेब, आदिलशाही व निजामशाहीशी दोन दोन हात करायला लावले असले तरी त्याच गोष्टीपासून बोध घेवून आपण अनेक औरंगजेबाच्या अत्याचारी वहीवाटींना तोंड देवू शकलो व त्याचाच फायदा आपल्याला इंग्रजांची गुलामगिरी धुडकावून लावण्यात झाला. त्या जर त्या काळात झाल्या नसत्या तर आजही आपण इंग्रजांचेच गुलाम असतो.

– **अंकुश शिंगाडे**, नागपूर ९३७३३५९४५०

# लासुर स्टेशन येथे शासकीय मका खरेदी केंद्राचा शुभारंभ: शेतकऱ्यांना मिळणार २४०० रुपये दर

**आत्ताच एक्सप्रेएस**

**लासुर स्टेशन/प्रतिनिधी**/गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन आणि परिसरातील शेतकऱ्यांच्या मागणीला यश आले असून, येथे शासकीय मका खरेदी केंद्राचे उद्घाटन उत्साहात पार पडले. खरेदी-विक्री संघाचे उपसभापती आप्पासाहेब पाचपुते यांच्या हस्ते या केंद्राचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी पहिल्यांदा मका विक्रीसाठी आणणारे शेतकरी जनार्दन गवळी यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.या केंद्रामुळे शेतकऱ्यांना प्रामुख्याने खालील फायदे मिळणार आहेत.योग्य बाजारभाव: खुल्या बाजारात दराची अनिश्चितता असते, मात्र या केंद्रावर शासनाने निर्धारित केलेला २४०० रुपये प्रति क्विंटल हा दर शेतकऱ्यांना मिळणार आहे.आर्थिक सुरक्षा: थेट शासकीय खरेदी होत असल्याने व्यापाऱ्यांकडून होणारी संभाव्य पिळवणूक थांबेल आणि शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळेल.स्थानिक सोय: लासुर स्टेशन पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना आपला माल लांब नेण्याची गरज पडणार नाही, ज्यामुळे वाहतुकीचा खर्च आणि वेळ वाचणार आहे.

मका विक्रीसाठी शेतकऱ्यांना आधी नोंदणी करणे अनिवार्य आहे. खरेदी-विक्री संघ लासुर स्टेशनच्या कार्यालयात खालील कागदपत्रांसह नोंदणी करता येईल.१. सातबारा उतारा (नवीन) २. सन २०२५-२६ चे ऑनलाईन पेरापत्रक (ज्यावर मका पिकाची नोंद असणे आवश्यक आहे) ३. बँक पासबुकची छायांकित प्रत (पैसे थेट खात्यात जमा होण्यासाठी) ४. आधार कार्ड.या कार्यक्रमाप्रसंगी खरेदी-विक्री संघाचे संचालक ज्ञानेश्वर वाघचौरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सुनील पाखरे, किशोर पवार, मोहनराव खंडागळे, रिचर्ड बत्तीशे, दिगंबर गोटे, प्रभू बागुल, कडू शेलार, सुनील दुसिंग, बाळासाहेब थोरात, सिद्धार्थ गायकवाड यांसह तहसील कार्यालयाचे प्रतिनिधी आणि खरेदी-विक्री संघाचे कर्मचारी उपस्थित होते. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपल्या मका पिकाची नोंदणी करून



शासकीय हमीभावाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### संत रविदास महाराज जयंती अध्यक्षपदी हरिभाऊ सवणे यांची निवड



**आत्ताच एक्सप्रेस**

**माजलगाव/ प्रतिनिधी. शेख हमीद/** राष्ट्रीय चर्मकार महासंघ ता.शाखा माजलगाव महत्त्वपूर्ण बैठक रविवार दि. ११ रोजी दुपारी २.०० वाजता रविदास छत्रपती संभाजी महाराज चौक माजलगाव येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.

या बैठकीत सर्वानुमते संत रविदास महाराज व वीर कंकया महाराज जयंती माजलगाव अध्यक्षपदी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांची एकमताने निवड झाली. जयंती सचिव मयूर वाघमारे, कोषाध्यक्ष रमेश जगताप, उपाध्यक्ष राधाकिसन भाळशंकर यांची यावेळी निवड करण्यात आली. या बैठकीसाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे कर्मचारी माजी जिल्हाध्यक्ष अशोक वाडेकर, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष ॲड.गणेश गवळी, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे माजी कार्याध्यक्ष सत्यनारायण उनवणे, वडवणी तालुका अध्यक्ष मधुकर ठोसर,पद्माकर कांबळे, नितीन कांबळे, प्रकाश आगवणे, सचिन वाघमारे,भगवान सोनवणे, प्रसाद वाघमोडे, संतोष पोहेकर, रणवीर काबला, अशोक सोनटक्के,विजय नरहिर,अशोक भालशंकर, विकास गायकवाड यांच्यासह अनेक समाज बांधवांची उपस्थिती होती.

### छत्रपती शाहू महाराज महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी




**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** सिल्लोड शिक्षण संस्था संचलित, छत्रपती शाहू महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (एन-११ हडको) येथे राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सिल्लोड शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. राहुल म्हस्के यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शीतल गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

या अभिवादन कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा. डॉ. पल्लवी साबळे, प्रा. डॉ. अश्विनी सोनोने, प्रा. डॉ. रोहिणी भाग्यवंत, प्रा. अनिल खंडारे, प्रा. क्षितिजा लांडगे, प्रा. महानंदा सुळे, डॉ. कल्पना काळे, प्रा. योगेश नरवडे, प्रा. गोरखनाथ शेळके आणि शिक्षकेत्तर कर्मचारी पूजा पगारे यांची उपस्थिती होती. सर्व उपस्थितांनी या थोर व्यक्तिमत्त्वांच्या विचारांना उजाळा देऊन त्यांना मानवंदना दिली.

### प्रा. बाबासाहेब माने यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची 'पीएच.डी.' प्रदान



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६६ व्या वार्षिक दीक्षांत समारंभात धारूर तालुक्यातील आंबेवडगाव येथील प्रा. बाबासाहेब माने यांना मान्यवरांच्या हस्ते अधिकृतपणे 'विद्यावाचस्पती' (पीएच. डी.) पदवी प्रदान करण्यात आली.

**संशोधनाचा विषय :** प्रा. माने यांनी नव्वदोत्तरच्या बदलत्या राजकारणाच्या संदर्भात विजय जावळे यांच्या कथात्मक साहित्याचा अभ्यास या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला होता. अंबाजोगाई येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवदास झेड. शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे संशोधन यशस्वीरित्या पूर्ण केले.

**दीक्षांत समारंभातील गौरव :** विद्यापीठाच्या या दिमाखदार सोहळ्यात भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेचे (खखडएठ) संचालक प्रा. डॉ. सुनील भागवत, कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. वाल्मीक सरवदे, प्रा. बाबासाहेब डोळे आणि कुलसचिव प्रा. प्रशांत अमृतकर यांच्या शुभहस्ते प्रा. माने यांना ही पदवी देऊन गौरविण्यात आले.

**शैक्षणिक पार्श्वभूमी :** अत्यंत जिद्दीने शैक्षणिक वाटचाल करणाऱ्या प्रा. बाबासाहेब माने यांनी यापूर्वी एम.ए., बी.एड. आणि एम.फिल. या पदव्याही संपादन केल्या आहेत. ग्रामीण भागातून येत त्यांनी मिळवलेले हे यश कौतुकास्पद मानले जात आहे.

**सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव :** या यशाबद्दल मार्गदर्शक प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ, उपप्राचार्य प्रा. शिंदे सर, प्रा. दिलीप भिसे, प्रा. राजपंखे, प्रा. घोडके, प्रा. भारती, प्रा. लोखंडे, प्रा. सुरेवाड, प्रा. हंडीबाग तसेच यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे येणाऱ्यासाठी १२ जानेवारीला टोलमाफी द्या

## खा.बजरंग सोनवणे यांची केंद्र व राज्याकडे मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी.अंगद मुंढे/** राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त दि. १२ जानेवारी २०२६ रोजी मातृतीर्थ सिंदखेडराजा (ता. सिंदखेडराजा) येथे होणाऱ्या भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर त्या दिवशी येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनांना टोलमाफी देण्यात यावी, अशी मागणी बीड लोकसभा मतदारसंघाचे खा. बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

यासंदर्भात खासदार सोनवणे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे (चडठऊ) व्यवस्थापकीय संचालक यांना सविस्तर पत्र पाठवून तातडीने आदेश काढण्याची विनंती केली आहे.

पत्रात नमूद केल्याप्रमाणे, राजमाता जिजाऊ जयंती अत्यंत श्रद्धा व उत्साहात साजरा केली जाते. या पावन प्रसंगी बीडसह मराठवाडा व राज्याच्या विविध भागांतून लाखो नागरिक, महिला मंडळे, युवक तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सिंदखेडराजा येथे दाखल होतात. त्यामुळे त्या दिवशी महामार्गांवर प्रचंड वाहतूक वाढते.

या पार्श्वभूमीवर कार्यक्रमासाठी येणाऱ्या भाविकांना कोणत्याही प्रकारचा वाहतुकीचा अडथळा निर्माण होऊ नये, तसेच वाहतूक सुरळीत व सुरक्षित राहावी, यासाठी १२ जानेवारी २०२६ रोजी मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व खासगी वाहने, एसटी बसेस, चारचाकी व इतर वाहनांना टोलमाफी देण्यात यावी, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.

टोलमाफीमुळे नागरिकांना आर्थिक दिलासा मिळेल, टोलनाक्यांवरील गर्दी कमी होईल आणि वाहतूक व्यवस्थापन अधिक सुलभ होईल, असेही खासदार सोनवणे यांनी पत्रात नमूद केले आहे. त्यामुळे या संदर्भात तातडीने आवश्यक आदेश निर्गमित करावेत, अशी विनंती त्यांनी संबंधित यंत्रणांकडे केली आहे.

# सबज्युनिअर राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धा; महाराष्ट्र मुलांच्या संघास रौप्य पदक

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** भारतीय सॉफ्टबॉल असोसिएशन व हरियाणा सॉफ्टबॉल असो. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दि.९ ते १२ जानेवारी २०२६ दरम्यान झज्जर (हरियाणा) येथे पार पडलेल्या ३८ व्या सब ज्युनिअर राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलांच्या संघास उपविजेते पदावर समाधान मानावे लागले.



साखळी सामन्यात महाराष्ट्राच्या मुलांनी पंजाब, मध्यप्रदेश,छत्तीसगड सामन्यात आंध्रप्रदेश,मध्यप्रदेश,संघास तसेच उपांत्य फेरीत छत्तीसगड संघास (४-३) होमरन तसेच अंतिम सामन्यात राजस्थान संघाकडून अतितटीच्या सामन्यात (१-०) होमरन च्या फरकाने पराभव पत्करावा लागला.

महाराष्ट्र संघाने उपविजेतेपद पटकाविल्याबद्दल भारतीय सॉफ्टबॉल संघटनेचे डॉ.प्रवीण अनावकर, कोषाध्यक्ष संतोष चव्हाण,वसीम राजा यांनी शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र मुलांच्या संघाने उत्कृष्ट कामगिरीबद्दल तसेच विजेतेपद प्राप्त केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल संघटनेचे अध्यक्ष मा.मंत्री गिरीषजी महाजन,सचिव डॉ.प्रदीप तळवेळकर, सहसचिव प्रशांत जगताप,गोकुळ तांदळे, डॉ.सुरजसिंग येवतीकर,रमाकांत बनसोडे,शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त किशोर चौधरी,रमेश भेंडागिरी, नितीन पाटिल,हेमंत देशपांडे, एन डी पखाले,अभय बिराज, कैलास कखरे, गणेश बेटूद आदींनी अभिनंदन केले.

अंतिम सामन्यात शंतनु धायगुडे ने भेदक पिचिंग करत व सोहम राऊत ने उत्कृष्ट क्षेत्ररक्षण करत राजस्थानच्या च्या खेळाडूना पाचही इनिंग मध्ये बाद केले पुढे हा सामना ५ इनिंग पर्यंत बरोबरी असल्यामुळे ट्राय ब्रेकर (वाढीव इनिंग) मध्ये महाराष्ट्र संघास १ होमरन ने पराभव पत्करावा लागला. तसेच या संघास राज्य शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त तथा आंतरराष्ट्रिय खेळाडू सुमेध तळवेलकर,NIS प्रशिक्षक भीमा मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

**विजयी मुलांचा संघ :** मोहित तुप्ते,सोहम राऊत, शंतनु धायगुडे,देवेश मालकर,स्वरूप इंगोले, हर्षित कोळी,नयन मांढरे,सार्थक चव्हान, श्रीतेज मडले, ज्योतिरादित्य शिंदे,स्वराज सोनजे, साई पाटील सुमितकुमार राय आदी.

# नांदेड - बंगलोर एक्स्प्रेस काही दिवस नांदेड - यशवंतपूर - नांदेड अशी धावणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड/प्रतिनिधी/** बेंगलोर स्थानकातील पिट लाईन क्रमांक ०३ ची कॅमटेक डिझाइननुसार कॅटवॉकसह पुनर्बांधणी करण्यात येणार आहे, यामुळे दिनांक १६.०१.२०२६ ते १०.०३.२०२६ पर्यंत ५४ दिवसांसाठी पिट लाईन क्रमांक ०३ आणि स्टेबलिंग लाईन क्रमांक ०५ च्या वापरावर निर्बंध घालण्यात आला आहे.

या निर्बंधामुळे हजूर साहिब नांदेड - बंगलोर- हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेस वरील कालावधीत नांदेड-यशवंतपूर -नांदेड अशी धावेल. ते पुढील प्रमाणे :

१. गाडी क्रमांक १६५९४ हजूर साहिब नांदेड - बेंगलोर एक्स्प्रेस दिनांक १६.०१.२०२६ ते १०.०३.२०२६ पर्यंत ५४ दिवसांसाठी हजूर साहिब नांदेड - यशवंतपूर अशी धावेल, हि गाडी यशवंतपूर येथे सकाळी ०४.१५ वाजता पोहोचेल. या कालावधीत बेंगलोर केंट आणि बेंगलोर येथील थांबे वगळण्यात आले आहे.

२. गाडी क्रमांक १६५९३ बेंगलोर - हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेस दिनांक १७.०१.२०२६ ते ११.०३.२०२६ पर्यंत ५४ दिवसांसाठी यशवंतपूर येथून रात्री २३.५५ वाजता सुटेल आणि यशवंतपूर - हजूर साहिब नांदेड अशी धावेल. या कालावधीत बेंगलोर आणि बेंगलोर केंट येथील थांबे वगळण्यात आले आहे.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ललित कला केंद्राची निर्मिती

## 'इथेच टाका तंबू' नाटकाची मुंबईतील २५व्या 'काळा घोडा कला महोत्सवासाठी' निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक/प्रतिनिधी/** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ललित कला केंद्राची निर्मिती असलेल्या इथेच टाका तंबू या प्रायोगिक नाटकाची कला क्षेत्रातील मानाचा समजल्या जाणाऱ्या मुंबई येथील *२५ व्या 'काळा घोडा कला महोत्सव'*साठी निवड झाली आहे. काळा घोडा कला महोत्सवाचे समन्वयक श्री. रवी मिश्रा व श्री. भाविक शाह यांचे सदर निवडीचे अधिकृत पत्र विद्यापीठास प्राप्त झाले आहे.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या ललित कला केंद्रामार्फत या नाटकाची निर्मिती करण्यात आली आहे. ललित कला केंद्राचे प्रा. दत्ता पाटील यांनी या नाटकाचे लेखन केले असून केंद्राचे संचालक श्री. सचिन शिंदे यांनी दिग्दर्शन केले आहे. हे दोन अंकी प्रायोगिक नाटक असून, काळा घोडा कला महोत्सवांतर्गत दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटरच्या नाट्यगृहात नाटकाचा प्रयोग सादर होणार आहे.

विद्यापीठाच्या माध्यमातून कौशल्य विकासाच्या विविध उपक्रमांसोबतच सांस्कृतिक क्षेत्रातही योगदान देण्याच्या उद्देशाने तसेच नाट्यशास्त्र शिक्षणक्रमाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांना तज्ज्ञ व नामांकित कलावंतांच्या मार्गदर्शनातून प्रेरणा मिळावी, या दृष्टीने या नाटकाची निर्मिती करण्यात आली आहे. या नाटकाची नुकतीच पद्मविभूषण रतन टाटा स्मरणार्थ मुंबई येथे झालेल्या नाट्यरतन या बहुभाषिक राष्ट्रीय नाट्यमहोत्सवासाठीही निवड झाली होती.

या नाटकात सुप्रसिद्ध अभिनेते उमेश जगताप, ओंकार गोवर्धन, आश्विनी कासार व अमेय बर्वे यांच्या भूमिका आहेत. नाटकाची प्रकाशयोजना प्रणव सपकाळे व निखिल मारणे यांनी केली असून नेपथ्य विक्रम नन्नावरे व प्रसाद चिने पाटील यांचे आहे. संगीत ऋषिकेश शेलार यांनी दिले असून संगीत संयोजन ऋषिकेश गांगुर्डे यांनी केले आहे. वेशभूषा अनिकेत खरे व कविता देसाई यांची आहे.

जगण्याची वाट चुकलेल्या एका मनस्वी तरुणाच्या परिवर्तनाची प्रक्रिया आणि त्या प्रक्रियेत सहभागी असलेल्या विविध सामाजिक घटकांचे सूक्ष्म विश्लेषण या नाटकातून प्रभावीपणे मांडण्यात आले आहे. नाटकाच्या निर्मितीतील विविध तांत्रिक बाजू तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नाट्यशास्त्राचे आजी-माजी विद्यार्थी समर्थपणे सांभाळत आहेत. सलग दुसऱ्या नामांकित नाट्यकला महोत्सवासाठी या नाटकाची निवड झाल्याबद्दल विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी आनंद व्यक्त केला आहे.

**नाटकाची उद्घोषणा अतुल कुलकर्णी यांच्या आवाजात :** प्रायोगिक नाट्य चळवळीला सातत्याने पाठबळ देणारे सुप्रसिद्ध अभिनेते अतुल कुलकर्णी यांनी इथेच टाका तंबू या नाटकाची संपूर्ण उद्घोषणा आपल्या दमदार आवाजात केली आहे. लेखक दत्ता पाटील आणि दिग्दर्शक सचिन शिंदे यांच्या नाट्यचौफुला या चार नाटकांच्या महोत्सवाचे आयोजनही श्री. अतुल कुलकर्णी यांनी मागील वर्षी केले होते.

# पारधी समाजासाठी अधिकाऱ्यांनी संवेदनशील होऊन सहकार्य करावे : डि. बि. काळे

## पाडळी येथे पारधी समाजासाठी संवेदीकरण कार्यशाळा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी/ प्रतिनिधी.अंगद मुंढे/** स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत पारधी हा मूळ प्रवाहा पासून दूर गेलेला आहे. पारधी समाजाला त्याचे न्याय्य हक्क समजलेले नाहीत म्हणून पारधी समाजात मागासलेपणा आहे. राज्य व केंद्र सरकारने समाजासाठी विविध योजना आणलेल्या आहेत मात्र समाज भित्रा असल्याने तो सरकारी अधिकाऱ्यांना भितोय. त्यामुळे पारधी समाजाच्या बांधवांना कागदपत्रे देण्यासाठी गाव पातळीवर सरपंच व ग्राम विकास अधिकारी तसेच संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी संवेदनशील होऊन सर्वो तोपरी सहकार्य करावे असे आवाहन ग्राम विकास अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री. डि. बि. काळे यांनी केले. ते पारधी समाजासाठी पाडळी येथील पारधी समाजासाठी आयोजित " संवेदीकरण कार्यशाळा " प्रसंगी मार्गदर्शन करत होते.

परतूर तालुक्यातही ग्रामपंचायत पाडळी येथे पारध प्रकल्प, क्रांती संस्था, पुणे व टाटा पॉवर कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्ट, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने पारधी समाजाविषयी पुर्वाग्रह, दुराग्रह, अनास्था दुर करून सादर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामूहिक दृष्ट्या प्रयत्न करण्यासाठी " संवेदीकरण कार्यशाळा " आयोजित कारण्यात आली होती. या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून ग्राम विकास अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डि. बि. काळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच प्रसाद काकडे, प्रमुख उपस्थितीत ग्राम विकास अधिकारी संघटनेचे तालुकाध्यक्ष बि. एस. चव्हाण, विस्तार अधिकारी मुरदकर, प्रा. लोखंडे मॅडम, मारोती खंदारे, इंगोले साहेब, पांडुरंग हिवाळे, सतीश वाव्हळ, ग्राम विकास अधिकारी सुवर्णा चाटे, जालिंदर चव्हाण, तसेच टाटा पॉवर चे प्रतीक सर, क्रांती संघटनेच्या सुनीता ताई भोसले, आयोजक ॲड. राजेश थोरात, प्रकाश सोनवणे, विजय पवार, मंगलाताई काळे, मधुकर थोरात, संतोष चव्हाण, दुर्गाताई काळे, मथुरा पवार तसेच पारधी समाजाला शासकीय योजनेचा लाभ व्हावा यासाठी उपविभागीय कार्यालय, तहसील, पंचायत समिती, महावितरण कार्यालयाचे प्रतिनिधी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, आरोग्य अधिकारी व सेविका, सह संबंधित सर्व शासकीय कार्यालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पुढे मार्गदर्शन करताना काळे म्हणाले की, पारधी समाजासाठी शासनाने धरती आबा, आदिशक्ती या सारख्या अनेक योजना सुरु केलेल्या आहेत. या योजनांचा लाभ घेण्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे मिळवताना समाजातील बांधवांनी अधिकाऱ्यांशी प्रेमाने वागून जे अभिलेखे उपलब्ध आहेत ते मिळवावेत व मुख्य प्रवाहात यावे. तसेच शिक्षण, रोजगार, निवारा सारख्या बाबी समजून घेऊन त्या मिळवाव्यात व स्वतः व समाजाचे हित लक्षात घेऊन वागावे यासाठी ग्राम स्तरावर सर्वोतोपरी सहकार्य मिळेल असा विश्वास दिला.

पारधी समाज हा प्रेमळ

याप्रसंगी ग्राम विस्तार अधिकारी मुरदकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पारधी समाज हा प्रेमळ आहे मात्र त्याच्या परंपरागत भाषेमुळे अधिकारी व इतर समाजाला त्याची भीती वाटते. ती भीती दूर होण्यासाठी अशा कार्यशाळेची आवश्यकता आहे. शासनाने धरती आबा किंवा पारधी समाजासाठी आवश्यक ज्या योजना लागू केलेल्या आहेत त्यासाठी लागणारे कागदपत्रे व लाभार्थ्यांना आलेला निधी देण्यासाठी सहकार्य लाभेल.

यावेळी टाटा पॉवर चे प्रतीक सर यांनी सांगितले की, टाटा पॉवर कम्युनिटी च्या माध्यमातून मागील आठ महिन्यापासून परतूर शहरातील पारधी वाड्यात काम करत आहे. त्याचा बराच फरक पडलेला असल्याने आम्ही आता गाव खेड्यातील पारधी सामाजापर्यंत जाऊन त्यांच्या अडीअडचणी समजावून त्या दूर करण्याचा प्रयत्न करत आहोत. समाजासाठी लागेल ती मदत पारध प्रकल्प आणि क्रांती संस्था, पुणे यांच्या सहकार्याने देण्याचा प्रयत्न करणार आहोत.

यावेळी पोलिस प्रा. लोखंडे मॅडम, मारोती खंदारे, सरपंच प्रसाद काकडे, पत्रकार हनुमंत दवंडे, ग्राम विकास अधिकारी सुवर्णाचे चाटे जि. प. शाळा पाडळी चे मुख्याध्यापक राठोड सर आदीनी उपस्थित पारधी समाजाला संबोधित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक ॲड. राजेश थोरात यांनी केले तर मधुकर थोरात यांनी मानले.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना** मंगळवार, १३ जानेवारी २०२६



# थंडी आणि अंधारापूर्वीच मतदानाचा हक्क बजावावा-अशीमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना (प्रतिनिधी)** जालना शहर महानगरपालिकेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणुकीमध्ये समाजातील प्रत्येक घटकाने आपला मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे. विशेषतः वयोवृद्ध आणि ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी माननीय जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी श्रीमती अशीमा मित्तल यांनी ज्येष्ठ मतदारांना सकाळीच मतदान केंद्रावर जाऊन आपला हक्क बजावण्याचे विशेष आवाहन केले आहे.

महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. सध्या हिवाळ्याचे दिवस असल्याने सायंकाळच्या वेळी थंडीचे प्रमाण वाढते आणि सूर्यास्तामुळे लवकर अंधार पडतो. ही बाब विचारात घेता, ज्येष्ठ नागरिक आणि वयोवृद्ध मतदारांनी सायंकाळपर्यंत न थांबता, सकाळच्या सत्रातच मतदान केंद्रावर उपस्थित राहून मतदान करावे, जेणेकरून त्यांना कोणत्याही त्रासाला सामोरे जावे लागणार नाही.

श्रीमती अशीमा मित्तल यांनी या संदर्भात बोलताना सांगितले की, ज्येष्ठ नागरिक हे लोकशाहीचे स्तंभ आहेत. त्यांचा सहभाग या निवडणुकीत अत्यंत मोलाचा आहे. थंडीच्या दिवसांत सायंकाळी होणारी गर्दी आणि कमी होणारा प्रकाश यामुळे वयोवृद्ध मतदारांना चालणे किंवा रांगेत उभे राहणे कठीण जाऊ शकते. त्यामुळे सर्व ज्येष्ठ बांधवांनी सकाळी लवकर मतदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे.ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांसाठी मतदान केंद्राच्या इमारतीमध्ये एक व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात आलेली आहे, प्राधान्याने प्रवेश, बसण्यासाठी व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे निर्देशही निवडणूक विभागाने दिले आहेत. तसेच प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे अधिपत्याखाली प्रत्येक प्रभागात ०२ ऑटो रिक्षा उपलब्ध करून देण्यात आल्या असुन, अशा एकूण १० ऑटो रिक्षा महापालिकेमार्फत जेष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांकरीता उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. १५ जानेवारी रोजी जास्तीत-जास्त नागरिकांनी घराबाहेर पडून शांततेत मतदान करावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आंबा येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**
**परतूर (सोपान वाघमारे)** स्थानिक कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (होस्टेल), आंबा (ता. परतूर) येथे राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब आणि थोर विचारवंत स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून विद्यालयात विविध प्रबोधनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसतिगृहा च्या गृहप्रमुख मंगल खवणे मॅडम होत्या.व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून रंजना माने मॅडम आणि देवकर सर यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

जयंतीनिमित्त विद्यालयातील विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्रावर आधारित प्रेरणादायी भाषणे दिली. तसेच काही विद्यार्थिनींनी पोवाडे आणि देशभक्तीपर गीते सादर करून वातावरणात चैतन्य निर्माण केले. विशेष आकर्षण म्हणजे, अनेक विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची वेशभूषा साकारली होती, ज्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

अध्यक्षीय भाषणात मंगल खवणे मॅडम यांनी विद्यार्थिनींना जिजाऊंचे संस्कार आणि स्वामी विवेकानंदांचे विचार अंगीकारण्याचे आवाहन केले. तरुणांनी ध्येयप्राप्तीसाठी स्वामीजींचा 'उठा, जागे व्हा' हा संदेश लक्षात ठेवावा, असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती खवणे मॅडम यांनी केले, तर उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या प्रसंगी कस्तुरबा गांधी होस्टेलमधील कर्मचारी वृंद आणि मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# जालन्यात संक्रांतीसाठी 'घेवर-फेणी'चा गोडवा

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना/प्रतिनिधी/** मकर संक्रांतीचा सण आता अवघ्या एक दिवसावर येऊन ठेपला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात तिळगुळाचे महत्त्व असले, तरी जालना शहरात मात्र संक्रांतीला 'घेवर-फेणी'ची देवाणघेवाण करण्याची एक अनोखी आणि जुनी परंपरा आहे. या परंपरेमुळेच सध्या जालना शहरातील बाजारपेठेत ठिकठिकाणी घेवर-फेणीची दुकाने सजली असून, ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.



संक्रांतीच्या काळात नातेवाईक आणि मित्रपरिवाराला मिठाई देण्याची प्रथा आहे. जालन्यात ही उणीव घेवर आणि फेणी भरून काढते. विशेषतः शुद्ध तुपातून तयार केलेल्या घेवरला ग्राहकांची मोठी मागणी असते. हे घेवर तयार करण्याचे काम अत्यंत कौशल्याचे असते. सध्या शहरातील मुख्य बाजारपेठ, कचेरी रोड आणि विविध भागांत कारागीर मोठ्या कढईमध्ये शुद्ध तुपातून घेवर काढताना दिसत आहेत.

घेवर तयार करणे ही एक कला आहे. मैदा, दूध आणि तुपाचे अचूक मिश्रण करून ते गरम तुपात विशिष्ट पद्धतीने सोडले जाते. त्याला जाळीदार आकार देणे आणि योग्य प्रमाणात तळणे यासाठी अनुभवी कारागिरांची गरज असते. (छायाचित्रकार मजहर सौदागर यांनी टिपलेल्या दृश्याप्रमाणे) सध्या हे कारागीर रात्रंदिवस मेहनत घेऊन ग्राहकांसाठी ताजी मिठाई उपलब्ध करून देत आहेत.


फेणीचे प्रकार: साधी फेणी आणि केशरी फेणी अशा दोन प्रकारात ही मिठाई उपलब्ध आहे.घेवरचे वैविध्य: साधे घेवर, साखर पाकातील घेवर आणि मलाई घेवर अशा विविध प्रकारांना पसंती मिळत आहे. दर: कच्च्या मालाच्या किमती वाढल्या असल्या, तरी परंपरेचा आनंद जपण्यासाठी नागरिक उत्साहाने खरेदी करत आहेत. जालन्याची ही परंपरा केवळ गोडवाच वाढवत नाही, तर स्थानिक छोट्या व्यावसायिकांना आणि कारागिरांना मोठा रोजगारही उपलब्ध करून देते. उद्या होणाऱ्या संक्रांतीसाठी आज दिवसभर बाजारपेठेत मोठी गर्दी राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## संक्षिप्त

### छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघ: अंतिम मतदार जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/**मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीसाठीची प्रशासकीय तयारी आता अंतिम टप्प्यात आली आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून आज या मतदारसंघाची अंतिम मतदार यादी अधिकृतपणे प्रसिद्ध करण्यात आली. या नव्या यादीनुसार, विभागात एकूण २ लाख ८८ हजार ७८३ पदवीधर मतदारांची नोंद झाली आहे.मतदार संख्येत मोठी वाढ१ नोव्हेंबर २०२५ हा अर्हता दिनांक धरून प्रशासनाने प्रारंभी प्रारूप मतदार यादी जाहीर केली होती. त्यावेळी विभागात २ लाख ४० हजार ५४९ मतदार होते. मात्र, त्यानंतर नाव नोंदणीसाठी देण्यात आलेल्या विशेष मुदतीत पदवीधरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्राप्त अर्जांच्या छाननीनंतर ४८ हजार २३४ नवीन नावांचा यादीत समावेश करण्यात आला आहे.जिल्हानिहाय मतदारांची आकडेवारीविभागातील आठही जिल्ह्यांची मिळून अंतिम मतदार संख्या खालीलप्रमाणे आहे:जिल्हामतदार संख्याछत्रपती संभाजीनगर८०,८८६ (सर्वात जास्त)बीड५४,२०६नांदेड३४,५२१जालना३१,९४३लातूर२७,६८८धाराशिव२६,८७६परभणी२३,५६४हिंगोली९,०९९एकूण विभाग२,८८,७८३स्त्री-पुरुष मतदार प्रमाणअंतिम मतदार यादीच्या विश्लेषणानुसार, एकूण २,८८,७८३ मतदारांपैकी पुरुष मतदारांचे वर्चस्व दिसून येत आहे.पुरुष मतदार: २,२१,१६१महिला मतदार: ६७,६०९इतर (तृतीयपंथी): १३नोंदणी प्रक्रिया अद्यापही सुरूविभागीय आयुक्त कार्यालयाने स्पष्ट केले आहे की, जरी अंतिम यादी प्रसिद्ध झाली असली, तरी मतदार नोंदणीची प्रक्रिया निरंतर स्वरूपात पुढेही सुरू राहणार आहे. ज्या पदवीधरांची नावे अद्याप यादीत आलेली नाहीत, त्यांना विहित नमुन्यात अर्ज करून नाव नोंदणी करता येणार आहे.

### राष्ट्रीय युवा सप्ताहाचे उत्साहात उद्घाटन



**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना(प्रतिनिधी)** शालेय शिक्षण व क्रीडा विभागअंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना यांच्या वतीने राष्ट्रीय युवा दिन व युवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.यानिमित्ताने औद्योगिक महाविद्यालय , जालना येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष पाचार्य श्रीमती. बकोले होते तर प्रमुख पाहुणे जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, प्रमुख वक्ते धनंजय पटिल व डॉ. सबनीस सर होते. श्रीमती लता लोंढे, श्रीमती आरती चिल्लारे (क्रीडा अधिकारी ), राहुल गायके यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली, सर्व मान्यवरांचे सत्कार करण्यात आले.

# जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**
**सोयगाव (प्रतिनिधी)** राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब आणि युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे 'युवा दिन' व 'राजमाता जिजाऊ जयंती' सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सोयगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (BDO) श्री. यमुलवाड साहेब यांच्या शुभहस्ते महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाला माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष रवींद्र काळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भागवत गायकवाड, माजी विद्यार्थी संघ सदस्य मंगेश सोहनी, समाजसेवक सुनील गावंडे, ज्येष्ठ पत्रकार भरत पगारे, पत्रकार पूनम परदेशी, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य अण्णा वाघ आणि रवींद्र साखळे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी साकारलेल्या जिजाऊ आणि स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमा होत्या. अनेक विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊंची वेशभूषा केली होती, तर विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांच्या पेहरावात सर्वांचे लक्ष वेधून घेतले. याप्रसंगी विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या जीवनावर प्रेरणादायी विचार मांडले.

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेवर आधारित 'दशसूत्री' कार्यक्रमांतर्गत सोयगाव शाळेने राबवलेल्या उपक्रमांच्या चित्रफीत (व्हिडिओ निर्मिती) चे उद्घाटन गटविकास अधिकारी यमुलवाड यांच्या




हस्ते करण्यात आले.यावेळी मार्गदर्शन करताना गटविकास अधिकारी यमुलवाड म्हणाले की, सोयगावची जिल्हा परिषद शाळा ही खाजगी शाळांनाही लाजवेल अशा दर्जाची असून येथील शैक्षणिक वातावरण आणि उपक्रम कौतुकास्पद आहेत. तर माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष रवींद्र काळे यांनी जिजाऊ आणि विवेकानंदांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन करत शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक किरण कुमार पाटील, पदवीधर शिक्षिका सुरेखा चौधरी, पंकज रगडे, मंगला बोरसे, प्रतिभा कोळी, सविता पाटील, गणेश बाविस्कर, अंकुश काळे, पांडुरंग बारगजे, मंदा मस्के, तानाजी चव्हाण आणि शुभम देसले यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वरठाणमध्ये राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात

**आत्ताच एक्सप्रेस**
**सोयगाव/विजय पगार/**सोयगाव तालुक्यातील बनोटी येथील लेट ए.के. इंग्लिश स्कूल व माध्यमिक विद्यालयाच्या वतीने राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती वरठाण येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयहिंद शैक्षणिक समाजसेवा संस्थेचे अध्यक्ष शेख शकुर यांच्या संकल्पनेतून दरवर्षी परिसरातील वेगवेगळ्या गावांमध्ये हा जन्मोत्सव साजरा केला जातो. यावर्षी वरठाण गावाला हा बहुमान मिळाल्याने संपूर्ण गाव भगवेमय झाले होते.



विद्यार्थ्यांच्या वेशभूषेने वेधले लक्ष

सोमवारी सकाळी ८ वाजता हनुमान मंदिरापासून मिरवणुकीला सुरुवात झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी साकारलेल्या ऐतिहासिक भूमिका विशेष आकर्षणाचे केंद्र ठरल्या:

राजमाता जिजाऊ: वैष्णवी जाधव,छत्रपती शिवाजी महाराज: साईनाथ पायगव्हाण,स्वामी विवेकानंद: गिरीश शिंदे,मावळे: रोहित यादव, प्रवीण शिंदे, सत्यम जीवरक, आदित्य चौधरी,हे सर्व विद्यार्थी घोड्यावर स्वार होऊन मिरवणुकीत सहभागी झाले होते. गावातील महिलांनी ठिकठिकाणी रांगोळी काढून आणि औक्षण करून मिरवणुकीचे स्वागत केले. जय भवानी, जय शिवाजी च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.या सोहळ्याचे औचित्य साधून वरठाण येथील तुषार अरुण शिंदे यांची महाराष्ट्र कारागृह पोलीस दलात निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. ग्रामीण भागातील तरुणाने मिळवलेल्या या यशाचे सर्व स्तरातून कौतुक झाले.

या कार्यक्रमाला केंद्रप्रमुख नितीन राजपूत, वरठाणचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तसेच बनोटी व पळाशीचे सरपंच उपस्थित होते.

# गंगापूरमध्ये १६ जानेवारीला 'हिंदू संमेलन'; सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांची प्रमुख उपस्थिती

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर (प्रतिनिधी)** हिंदू धर्म, संस्कृती आणि समृद्ध परंपरांच्या संवर्धनासाठी आणि हिंदू समाजात ऐक्याची भावना दृढ करण्यासाठी गंगापूर शहरात भव्य 'हिंदू संमेलना'चे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक पू. डॉ. मोहनजी भागवत यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे.

हिंदू संमेलन समिती, गंगापूर यांच्या वतीने आयोजित हे संमेलन शुक्रवार, दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता गंगापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मैदानावर संपन्न होणार आहे.

संमेलनाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून आज, १२ जानेवारी रोजी नियोजित स्थळी (जिल्हा परिषद मैदान) भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर शहरातून भव्य बाईक रॅली काढण्यात आली. 'जय श्रीराम'च्या घोषणांनी अवघे शहर दुमदुमले होते. या रॅलीत शेकडो हिंदू बांधव आणि भगिनी मोठ्या



संख्येने सहभागी झाले होते, ज्यामुळे संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या संमेलनाला केवळ सरसंघचालकच नव्हे, तर महाराष्ट्रातील थोर संत-महंतांची देखील उपस्थिती लाभणार आहे. यामध्ये प्रामुख्याने:ह.भ.प. गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज (श्री क्षेत्र देवगड संस्थान),ह.भ.प. गुरुवर्य महंत रामगिरीजी महाराज (मठाधिपती, गोवर्धन धाम, श्री क्षेत्र सरलाबेट),जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज (श्री जनार्दन स्वामी आश्रम, वेरूळ),ह.भ.प. गाथामूर्ती रामभाऊजी महाराज राऊत (श्री विठ्ठल आश्रम, जाखमाथा) या संमेलनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन, संस्कृती रक्षण आणि राष्ट्रभक्तीचा संदेश घराघरात पोहोचवण्याचा संकल्प समितीने केला आहे. हिंदू समाजातील प्रत्येक घटकाने संघटित होऊन धर्मजागृतीसाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन हिंदू संमेलन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रशासकीय पातळीवर आणि स्वयंसेवकांकडून या भव्य सोहळ्याची जय्यत तयारी सुरू असून, १६ जानेवारी रोजी होणाऱ्या या विचारांच्या महाकुंभाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# मकर संक्रांतीच्या पूर्वसंध्येला बाजारपेठा फुलल्या; सुगड, वाण आणि तिळगुळाच्या खरेदीसाठी महिलांची अलोट गर्दी

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना/प्रतिनिधी/**'तिळगूळ घ्या, गोड-गोड बोला' असा संदेश देणारा वर्षाचा पहिला सण 'मकर संक्रांत' अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने बाजारपेठेत चैतन्याचे वातावरण पसरले आहे. संक्रांतीसाठी लागणारे पूजेचे साहित्य, सुगड (मातीची गाडगी), तिळगूळ आणि वाण खरेदी करण्यासाठी महिलांनी बाजारपेठेत प्रचंड गर्दी केली आहे.मकर संक्रांतीला हिंदू संस्कृतीत मोठे महत्त्व आहे. या दिवशी सूर्याचा मकर राशीत प्रवेश होतो. या निमित्ताने सुवासिनींकडून केल्या जाणाऱ्या 'वाण' लुटाच्या परंपरेमुळे बाजारपेठेत विविध वस्तूंनी दुकाने सजली आहेत. प्रामुख्याने मातीची सुगडे, बोरे, ऊस, हरभऱ्याचे डहाळे, गाजर आणि तीळ-गुळाच्या वड्यांना मोठी मागणी दिसून येत आहे.

संक्रांतीच्या दिवशी महिला एकमेकींना वाण देतात. यासाठी स्टीलच्या वस्तू, प्लास्टिकची भांडी, सौंदर्य प्रसाधने आणि इतर गृहोपयोगी वस्तूंच्या खरेदीसाठी महिलांची पावले बाजारपेठेकडे वळत आहेत.

यंदा बाजारपेठेत नवनवीन डिझाईनची 'वाण' उपलब्ध असून, महिला आपल्या पसंतीनुसार खरेदी करत आहेत. विशेषतः सुगड पूजन हे संक्रांतीचे मुख्य आकर्षण असल्याने कुंभार गल्ली आणि मुख्य बाजारपेठांमध्ये मातीची गाडगी खरेदी करण्यासाठी महिलांची झुंबड उडाली आहे.



तिळगुळाचे विविध प्रकार: साध्या साखरेच्या हलव्यासोबतच गुळाची रेवडी, चिक्की आणि तीळ-गुळाचे लाडू यांना ग्राहकांची पसंती मिळत आहे. वाणाचे वैविध्य: काचेच्या बांगड्यांपासून ते आधुनिक भेटवस्तूंपर्यंत अनेक पर्याय उपलब्ध आहेत.हलव्याचे दागिने: लहान मुलांच्या बोरन्हाणासाठी आणि नववधूंच्या 'हळदी-कुंकू' समारंभासाठी हलव्याच्या दागिन्यांची मोठी मागणी आहे.गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा वस्तूंच्या किमतीत १० ते १५ टक्क्यांनी वाढ झाली असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. साहित्याचे दर वाढले असले तरी सणाचा आनंद साजरा करण्यासाठी महिलांच्या उत्साहात कोणतीही कमतरता दिसून येत नाही.संक्रांत हा स्त्रियांचा जिव्हाळ्याचा सण आहे. या दिवशी एकमेकींना भेटून वाण देण्याची परंपरा आजही जपली जाते. साहित्याचे भाव वाढले असले तरी परंपरेनुसार खरेदी करावीच लागते. - एक महिला ग्राहक

**हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.**
**मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247**
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813